सामाजिक न्याय विभागाअंतर्गत स्वंयंसेवी संस्थामार्फत कार्यरत अनुदानीत वसतीगृहे यांना आकारण्यात येणा-या इमारत भाडे निश्चिती बाबत

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन शुध्दीपत्रक क्रमांक:-बीसीएच-२०१५/प्र.क्र.३२७ /शिक्षण-२

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०००३२

दिनांक : १४ सप्टेंबर, २०१७

वाचा- शासन निर्णय क्रमांक.बीसीएच-१०९७/प्र.क्र.१००/मावक-४, दि.१६ मार्च १९९८

शुध्दीपत्रक -

संदर्भाधिन शासन निर्णयातील अनु.क्र. ८ मधील अनुदानाचे निर्धारण शिर्षकाखालील (ड) मध्ये नमुद केलेल्या परिरक्षण अनुदानाबाबत नमुद केलेल्या मजकुराऐवजी पुढील प्रमाणे वाचावे

"सामाजिक न्याय विभागाअंतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत कार्यरत असलेल्या अनुदानीत वसतिगृह, इमारतींसाठी सद्यस्थितीत दोन प्रकारे इमारत भाडे निश्चित करण्यात येते. अनुदानीत वसतिगृह भाड्याच्या इमारतीत असल्यास, इमारतीच्या भाड्याबद्दल व्यवस्थापनाने केलेल्या खर्चाच्या ७५ % इतके सहायक अनुदान देण्यात येते.तसेच वसतिगृह इमारत व्यवस्थापनाचे मालकीची असेल तर इमारतीचे भांडवली मूल्य नक्की करण्यात येते.एकुन भाडेमुल्याच्या ७.५ टक्के इतकी रक्कम निश्चित करण्यात येवुन त्याच्या ५० टक्के इतके परिरक्षण अनुदान देण्यात येते.या दोन्ही भाडे निश्चितीच्या प्रक्रियेमध्ये समानता/ सुसुत्रता आणुन जास्तीत जास्त संस्थाचालकांना स्वमालकीच्या इमारती बांधण्याकरिता प्रोत्साहन देण्यासाठी एकसुत्रता असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने संस्थेच्या स्वत:च्या मालकीच्या इमारतीच्या भाडेमुल्याच्या ७.५ टक्केच्या ५० टक्के म्हणजे ३.७५ टक्के ऐवजी ७.५० टक्के इतकी रक्कम परिरक्षण अनुदान देण्यात यावे".सदर शासन निर्णय सन २०१७-१८ या वर्षापासून लागू होईल.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०९१४१४४२४६५०२२ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2017.09.14 14:32:23 +05'30'

(ज्ञा.ल.सुळ)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.

१. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.

२. सर्व प्रादेशिक उपायुक्त/ सहायक आयुक्त/ जिल्हा समाजकल्याण अधिकारी, महाराष्ट्र.